उपयोजित नीतिशास्त्र

समस्या व उपाय



संपा. डॉ. सुनील साळुंके

उपयोजित नीतिशास्त्र :समस्या व उपाय

:: संपादक मंडळ ::

डॉ.सुनील साळुंके

डॉ. सुरेंन्द्र गायधने

डॉ.दिलीप नागरगोजे

प्रा.शीतल येरुळे

अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद

२०१९

- उपयोजित नीतिशास्त्र :समस्या व उपाय - डॉ. सुनील साळुंके (मुख्य संपादक)

-Upayojit neetishastra: Samasya Va Upay - Dr.Sunil Salunke (Chief Editor)

- प्रथमावृत्ती - फेब्रुवारी,२०१९.

©अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद

- प्रकाशक:व्यंकटराव मोरे

  मैत्री प्रकाशन,

  सिद्धेश्वर रोड, देशपांडे गल्ली,

  लातूर-४१३५१२

  मो. 9850740367/ 8329351614

- मुद्रणस्थळ : रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद.
- मुखपृष्ठ : श्री. बालाजी लांडगे
- पृष्ठ जुळणी : डॉ.संगीता मोरे
- पृष्ठ संख्या : 298
- मूल्य : ₹. 300/-
- ISBN:978-93-84810-46-7

अनुक्रमणिका

01.त्रिस्तरीय उपयोजित नीतिशास्त्राची दिशा : डॉ. शर्मिला जयंत वीरकर ...007

02.आदर्शी आणि उपयोजित नीतिशास्त्र व मानवी जीवन
:डॉ. सुरेन्द्र गायधने ... 013

03.उपयोजित नीतिशास्त्राचे स्वरुप आणि प्रकार :डॉ.एन.के.रासकर ... 017

04.नैतिक सिध्दांताचे उपयोजित नीतिशास्त्र : विकास गायकवाड ... 023

05.उपयोजित नीतिशास्त्र : समस्या आणि उपाय : डॉ.माधवी बादाडे ... 025

06.नीतिचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्व
: मोनालिसा अ. खानोरकर ... 029

07.सरोगसी नियमन : वैशाली माधवराव दिवे ... 034

08.सरोगसी आणि नैतिकता : डॉ.सुनंदा भुसारे ... 042

09.क्लोनिंग तंत्रज्ञान आणि काही नैतिक प्रश्न : डॉ.सचिन खोकले ... 048

10.आत्महत्या: एक नैतिक समस्या : डॉ. स्वाती कुलकर्णी ... 053

11.मानवी अवयव प्रत्यारोपण संकल्पना आणि नीतिशास्त्र
: डॉ. प्रभाकर किर्तनकार ... 060

12.दयामरण आणि नैतिकता : डॉ. अनिल शिंदे ... 063

13.दयामरण एक नैतिक चिंतन : डॉ. बालाजी नरवाडे ... 066

14.दयामृत्यू :एक तात्विक चिकित्सा : डॉ. ग्यानदेव उपाडे ... 072

15.गर्भपात: एक नैतिक समस्या : डॉ. दिलीप नागरगोजे ... 081

16.वेश्यावृत्ती: चिंतन,एक काळाची गरज : डॉ. नरेन्द्र रघटाटे ... 085

17.कृत्रिम बुद्धिमत्ता एक नैतिक आव्हान! : डॉ. रीना अविनाश पितळे ... 098

18.लिंगभेद आणि समता : डॉ.सुनील साळुंके ... 107

19.मुल्यविचार : डॉ.सुनील अं. काळमेघ. ... 111

20.विवाह – आधुनिक आव्हाने : डॉ. सुनिलदत्त गवरे ... 114

21.विचाराच्या दमनाचा दुष्परिणाम–अपंगत्व : डॉ.वेदप्रकाश डोणगावकर ... 120

22.स्त्रीवादाचे नीतिशास्त्र : शितल येरुळे ... 124

23.आचरण : डॉ. सुरेखा आडगावकर ... 127

24.प्रसार माध्यमातील (मोबाईल) अनैतीकता आणि वाढणारे नैराश्य
: डॉ.वृषाली आंबटकर ... 135

25.वैद्यकीय व्यवसायातील अनैतिकता : एक ज्वलंत प्रश्न
: डॉ.विजय शेडगे ... 139

26.वैद्यकीय नीतिशास्त्र : समस्या व उपाय :डॉ. बाळासाहेब मुळीक ... 144

21.विचाराच्या दमनाचा दुष्परिणाम : अपंगत्व

डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर

भारताच्या नव्हे जगाच्या इतिहासामध्ये नैतिक विचारांची एक परंपरा आहे. ज्याला अनुसरुन आपण आजवर सदगुण, महाव्रत, अष्टांग मार्ग, यम–नियम, साधन चतुष्टी इत्यादी नीतिमूल्यांचा अभ्यास केला आहे. पण मानवाचा विविधांगी असलेला स्वभाव आणि परिस्थितीनूसार वागण्याची त्याची वृत्ती लक्षात घेता समाज जीवनात या मूल्यांची जोपासना करण्यात तो अपयशी ठरला आहे; असे दिसून येते. म्हणून या ठिकाणी एक प्रश्न असा उपस्थित होतो की, मनुष्य आपल्या वैयक्तिक जीवनात तरी या मूल्यांना वाव देतो का ? सदर प्रकरणाच्या शिर्षकाच्या अनुषंगाने विचारावयाचे झाल्यास आपण आपल्या पुरते तरी प्रामाणिकपणा, निर्भीडता, धैर्य या मूल्याची जोपासना करतो का ? हा या ठिकाणचा मूळ प्रश्न आहे. हा प्रश्न उपस्थित करण्यामागचे कारण असे की एक एलिजाबेथ नावाची महिला, जीच्या मनात एक प्रतिकूल विचार येतो आणि परिणामी ती अपंग होते, तीचे दोन्ही पाय निकामी होतात. ती महीला दुसरी तिसरी कोणी नव्हती तर सिगमंड फ्रायडची एक रुग्ण होती.

आपण सर्वजन मानव आहोत. आपल्यात असाही विचार येऊ शकतो की, त्याचा आपण सामना करु शकत नाहीत. आपल्यात प्रलोभन ही उत्पन्न होते. इतकेच नव्हेतर आपण त्या प्रलोभनचे शिकारही बनतो. या शिवाय आपण दुर्बल देखिल आहोत आणि आपली ही दुर्बलताच आपल्यावर घाला घालते. परिणामी आपणच आपल्या आयुष्याला विनाश करतो. असाच विनाश एलिजाबेथ नावाची ती महीला करायला चालली होती. एलिजाबेथचे पाय दुखत असत आणि तीला चालता येत नव्हेत; हाच तीचा आजार होता. वास्तविक पहाता तीचा तो आजार शारिरिक होता तर फ्रायड हा मनोउपचार तज्ञ होता. वर वर पहाता तीच्या आजाराचा आणि मनोउपचारतज्ञाचा काय संबंध ? असा प्रश्न सहज पडतो. पण वियनाच्या अनेक तज्ञांकडे जावूनही यश

न आल्यामूळे एलिजाबेथ कोणाच्यातरी सांगण्यावरुन फ्रायडकडे आली होती.

फ्रायडचा हा विश्वास होता की, बाह्य विषयाचे मूळ हे आंतर मनात असते. आणि त्याने त्याचा हा विश्वास अनेक रुग्णांच्या यशस्वी उपचाराने सिद्ध करुन दाखविला. एलिजाबेथचा आजार हा जरी बाहेरुन दिसणारा असला तरीही त्याची मूळे आत–तीच्या मनात रुजलेली होती. [अशा या आजाराला 'हिस्टीरिया' असे नाव आहे.] बहिणीच्या मृत्यू प्रसंगी प्रेताच्या शेजारी उभी असतांना एलिजाबेथच्या मनात एक भावना येऊन जाते आणि खऱ्या अर्थाने तीच्या अपंगत्वाला तेथूनच सुरवात होते. ती भावना, आपल्या त्या मृत बहिणीच्या नवऱ्यासोबत विवाह करण्याची होती.

विवाह ही एक अशी बाब आहे की, ज्यात लैंगिक प्रेरणेची जोपासना होते, प्रजोत्पादन करता येते, सहकारी मीळाल्यामूळे सुरक्षीततेची भावना जागृत होते. पण विवाहासंबंधीचा विचार कधी व कूठे करावा ? कोणशी विवाह करण्यासंबंधी विचार करावा ? इत्यादी अनेक प्रश्न आपल्या समाज व्यवस्थेला अनुसरुन उपस्थित होतात. कारण आपल्या समाजाचे काही नैतिक मापदंड आहेत. त्यानूसार कार्यतर सोडाच विचार करण्यासंबंधीची सुद्धा आपल्याकडे मुभा नाही ! कदाचित यासर्व बाबींची जान ठेऊन एलिजाबेथ आपल्या बहिणीच्या मृत्यू प्रसंगी तीच्या प्रेताच्या शेजारी असलेल्या तीच्या नवऱ्या सोबत लग्न करण्याचा विचार करु लागते. परिणामी हा प्रकार किती घाणेरडा आहे. आपण किती घृणास्पद आहोत असे ती मानू लागते. अर्थातच एलिजाबेथच्या मनात आत्मक्लेषाची भावना येते आणि ती आपला चेहरा लपवते. [उपचारा दरम्यान फ्रायड जेव्हा तीला सम्मोहीत करुन विचारतो तेव्हा तीचे हे उत्तर होते. विशेष म्हणजे सम्मोहनातून बाहेर पडल्यानंतर आपण सम्मोहनाच्या आवस्थेत जे बोललो त्या विषयीची जान तीला असते.]

त्यावर फ्रायड तीला काही प्रश्न विचारतो ते असे :

1) एखादा असाही विचार असतो का जो व्यक्तिच्या आत (अंतर्मनात) उठतो आणि त्या विचाराचा सामना ती व्यक्ति करु शकणार नाही ?

2) आपण सर्वजन मानव नाही का ?

3) आपल्या सर्वांमध्ये मानवोचित (मानवाला उचित वाटणारी) प्रलोभन येत नाहीत का ?

4) आपण सर्वजन त्या प्रलोभनाचे शिकार होत नाहीत का ?
5) आपल्या सर्वांमध्ये असे दुर्बल्य नाही का की, जे वेळ प्रसंगी आपल्यालाच धरुन दाबते ?[1]

फ्रायडच्या या प्रश्नांमूळे एलिजाबेथ काहीशी स्थिरावते. आपण दोषी नाहीत असेही तीला वाटू लागते. परिणामी ती फ्रायडला विचारते सुद्धा की, तूमच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की मी भ्रष्ट नाही ? मी निर्बल नाही ? मी घष्णेच्या योग्य नाही ?[2] एलिजाबेथच्या प्रश्नांवर 'हो तू भ्रष्ट, निर्भय आणि घ्रणेच्या योग्य नाहीस !' असे उत्तर देण्याऐवजी फ्रायड मात्र तीला म्हणतो 'जो आपल्या दुःखांकडून हारतो तो निर्बल असतो.'[3] त्याचे हे मत ऐकूण एलिजाबेथ चिडून त्याला म्हणते की, कशा प्रकारे मी दुःखांना घाबरुन पळाले ? तूम्हाला दिसत नाही मी किती दुःख सोसत आहे ? याला दुःखापासून पळणे असे म्हणतात ?[4] चिडलेल्या एलिजाबेथला शांत करण्याऐवजी फ्रायड तीला पुन्हा म्हणतो की, "तू आपल्या रोगी बहीणीच्या (प्रेताच्या) बाजूला थांबून जो विचार केले होता त्याच्याशी सामना करण्याऐवजी स्वतः रोगी बनुन त्या विचारांपासून पळाली आहेस. परिणामी तूझ्या पायात त्रास सूरु झाला आणि तू चालण्यास असमर्थ झालीस. अर्थात तू आपल्या स्वतःला एका रोगाच्या आड लपवविले आहेस. तू कधीच विचार केला नाहीस की तूला हे अपंगत्व का आले. तू सदैव आपल्या पायाच्या या त्रासाकडेच आपले लक्ष केंद्रित करीत राहीलीस. तू कधीच विचार केला नाहीस की याचे कारण काय आहे."[5] या शिवाय फ्रायड तीला म्हणतो की, "तू अपंगत्व पत्करुन आपल्या बहिणीच्या नवऱ्यासोबत लग्न करण्यापासून स्वतःला वाचवलस. इतकेच नव्हे तर प्रलोभनात फसण्यापासूनही तू स्वतःचा बचाव केलास. पण खऱ्या अर्थाने त्या प्रलोभणाला आपल्या आत–मनातच दडवून ठेवले. तू त्याच्याशी सामना करण्याचे धाडस दाखवले नाहीस."[6] फ्रायडचे हे बोलने ऐकूण एलिजाबेथ त्याला विचारते की, ज्या गोष्टीमूळे मी घाबरली होते, आपल्या ज्या व्यवहाराला मी नैतिक मापदंडाच्या प्रतिकूल समजले होते आणि ज्याच्यामूळे मला संताप झाला, त्याच्याशी सामना करण्यातच माझे धैर्य होते का ?[7] एलिजाबेथच्या या प्रश्नाच्या संदर्भात मात्र यावेळी फ्रायड 'हो' असे उत्तर देतो. अर्थात तो हे सुचवितो की, आपला वैयक्तिक व्यवहार हा नैतिक मापदंडाच्या प्रतिकूल नसतो. आणि म्हणून

त्याविषयी आपण मनस्ताप ही करुन घ्यायचा नसतो. मात्र तो व्यवहार वा तो विचार आपल्या इतर कार्यात बाधा ठरत असेल तर त्या विषयी धैर्याने त्यावर विचार केला पाहिजे आणि शक्य तेवढया प्रमाणा त्यापासून बाजूला राहीले पाहिजे. [पुढे एलिजाबेथही आपल्या मनात उत्पन्न झालेल्या त्या प्रतिकूल विचारांशी सामना करते आणि आपल्या अपंगत्वावर मात करते.]

एकंदर वरील संपूर्ण विवेचनावरुन या ठिकाणी हे सिद्ध होते की, आपल्या समाजात एखाद्याच्या मृत्यू प्रसंगी, आपल्या बहिणीच्या नवऱ्यासोबत विवाह करण्याचा 'आपल्या मनात' आलेला विचार हा नैतिक मापदंडाच्या प्रतिकूल समजले जाते. या शिवाय येथे हे सुद्धा सिद्ध होते की, जे आपल्या मनाच्या–भावनेच्या अनुकूल आहे, पण समाज व नीति नियमाच्या प्रतिकूल मानले जाते, त्याचा आपण बोध करुन घेण्याऐवजी किंवा बोध करुन त्याचा सामना करण्याऐवजी त्याचे दमन करीत असतो, आणि परिणामी आपण त्याचा आपल्या आरोग्यावर विपरित परिणाम करुन घेतो. वास्तविक पहाता आपल्या मन व भावनेनूसार आपले संपूर्ण विचार हे अनुकूलच असतात. त्यापैकी काही विचार हे इतरांसाठी किंबहुना समाजासाठी प्रतिकूल असतात. समाजासाठी प्रतिकूल असलेले विचार हे आपल्यासाठी कसे अनुकूल असू शकतात ? या विचाराने आपण भयभित होतो, निर्बल होतो. कधी कधीतर आपण आपला आत्मविश्वास गमावून बसतो. आणि हाच खऱ्या अर्थाने प्रतिकूल विचारांच्या दमनाचा दुष्परिणाम असतो.

संदर्भ :

1 ते 7) सिगमेंड फ्रायड और मनोविश्लेषण, पद्मा कुमारी, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर,1991, पृ.62 ते 63

●●●